# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २२.०९.२०२४ (रविवार)**

.........................................................................................................................................

## संपुर्ण महाराष्ट्र राज्यात रूग्णालयांमध्ये खोटे कागदपत्रे सादर करून बनावट औषधींचा साठा वितरीत करणाऱ्या आतंरराज्यीय टोळीचा पर्दाफाश

महाराष्ट्रातील विविध जिल्हयातील रूग्णालयांमध्ये महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, उत्तराखंड येथील आंतराज्यीय टोळीतील आरोपींनी खोटे कागदपत्रे सादर करून बनावट औषधींचा साठा वितरीत केल्याची घटना उघडकीस आली असुन या आंतराज्यीय टोळीने सन २०२१ पासुन ते आतापावेतो महाराष्ट्रातील विविध जिल्हयातील रूग्णालयांमध्ये बनावट औषधी वितरीत केल्या आहेत. सन २०२२ मध्ये ठाणे जिल्हयातील इंदिरा गांधी मेमोरिअल हॉस्पीटल भिवंडी येथील औषध भांडार येथे आरोपींनी वितरीत केलेल्या Formox 250 या बनावट औषधीचा नमुना सापडला होता त्यावरून पो.स्टे. शांतीनगर ठाणे शहर येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता. तेथे टोळीतील मुख्य आरोपी विजय शैलेन्द्र चौधरी, रा. मिरा रोड ठाणे याने बनावट औषधी कानपुर उत्तरप्रदेश येथुन खरेदी केल्याबाबतची बिले सादर करून पोलीसांची दिशाभुल केली होती.

फरवरी २०२३ मध्ये नागपुर जिल्हयातील ग्रामीण रूग्णालय कळमेश्वर येथुन औषध निरीक्षक श्री नितीन भांडारकर यांनी Ciprofloxacin Recip 500 या औषधीचा नमुना घेवुन प्रयोगशाळेत परिक्षणासाठी पाठविला. परीक्षणाचा अहवाल आल्यावर त्यांना समजले कि सदर ची औषध आरोपी क्र नामे १) हेमंत धोंडीबा मुळे वय ४२ वर्ष कव्वा रोड, लातुर यांचे मालकीचे मे. जया इंटरप्रायजेस लातुर यांचे कडुन जिल्हा शल्य चिकीत्सक नागपुर औषध भंडार येथे पुरवठा झाला. आरोपी क्र १ यांनी सदर बनावट औषधी आरोपी नामे– २) मिहीर शशिकांत त्रिवेदी वय ३८ वर्ष रा भिवंडी यांचे कडुन मागविली होती. आरोपी क्र २ यांनी सदर औषधी ही विजय शैलेद्र चौधरी वय ३२ वर्ष रा मीरा रोड ठाणे यांच्या मालकीच्या मे. काबीज जनरीक हाउस मिरा रोड ठाणे यांचेकडुन खरेदी केल्याचे चौकशीत दिसुन आले. सदर बनावट औषधीचे उत्पादनाबाबत तपास होणेसाठी त्यांनी पोलीस स्टेशन कळमेश्वर जिल्हा नागपुर ग्रामीण येथे दिलेल्या तक्रारीवरून अपराध क्र. ५७/२०२४ कलम ४२०,४६७,४६८,४७१,२७४,२७५,२७६,१२०(ब),३४ भादवि चा नोंद करण्यात आला. मा. पोलीस अधिक्षक साहेब मा. श्री हर्ष पोद्दार यांचे आदेशाने सदर गुन्हा मा श्री अनिल म्हस्के ( I.P.S.) तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग यांचेकडे देण्यात आले.


तपासादरम्यान असे निर्देशनास आले कि आरोपी क्र १ ते ३ यांनी सदर बनावट औषधी ही लाडवा हरियाणा येथिल के.पी. मेडीकल एजन्सी याचेकडुन खरेदी केले. त्याबाबतचे बील सादर करून मा. सत्र न्यायालय, मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपुर येथुन अटकपुर्व जामीन मिळविला. परंतु सदर गुन्हयाचे तपास अधिकारी मा. श्री. अनिल म्हस्के ( I.P.S.) ASP तथा SDPO सावनेर विभाग यांनी त्यांचे तपास पथक हरीयाणा येथे पाठविला असता के पी मेडीकल एजंसी हे अस्तित्वात नसल्याबाबत समजले. सदर गुन्हयाचे तपासी अधीकारी यांनी तपासादरम्यान मिळविलेले पुरावे मा. सत्र न्यायालय व उच्च न्यायालय यांना सादर करून आरोपीचा अटकपुर्व जामीन नामंजुर करून घेतला.

नमुद आरोपींना अटक करून त्याचा पी.सी.आर. घेण्यात आला चौकशी दरम्यान आरोपी क्र १ ते ३ यांनी सदर बनावट औषधी ही सहारनपुर उत्तरप्रदेश येथिल आरोपी क्र ४) नामे– रॉबीन उर्फ हिमांशु विजयकुमार तनेजा व ५) रमन विजयकुमार तनेजा या दोन्ही भावांकडुन खरेदी केले असल्याचे सांगितले. त्या दोघांनाही अटक करण्यात आली. तपासादरम्यान असे निर्दर्शनास आले कि सदर बनावट औषधी ही द्वारिका नॅचरल फॉर्म्युलेशन चा मालक आरोपी नामे– ६) अमीतकुमार सुरेशचंद धिमान याचेकडुन खरेदी केली. अमीतकुमार धिमान यांचे कडे जनावरांचे औषधीचे फॅक्ट्री असुन याच फॅक्ट्री मध्ये आरोपीने मानवी जिवीतास धोकादायक असलेल्या बनावटी औषधी तयार केल्याचे समजले. त्यालासुध्दा तपासादरम्यान अटक करण्यात आली.

गुन्हयाचे तपासात आरोपींनी Ciprofloxacin, Livofloxacin, Amoxyllin, Cefixime, Azithromycin अशा औषधी वेगवेगळया नावाने तयार करून त्याबाबत SUPER TECH MEDI LAB, EVERTOUCH BIO REMEDIES, ONE TOUCH BIO SCIENCE अशा अस्तीत्वात नसलेल्या कंपन्यांचे प्रयोगशाळेचे प्रमाणपत्र व M/s Steffan Formulation, M/s Refant Pharma Pvt. Ltd., M/s Marine Hydrocolloids, M/S Ginx Pharmakon LLP अशा अस्तीत्वात नसलेल्या उत्पादक कंपन्यांच्या नावाने आणखी बनावट औषधी तयार करून स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी या बनावट औषधींच्या सेवनाने लोकांचा मृत्यु होवु शकतो हे माहीत असुनही त्या बाजारात उपलब्ध करून शासनाची व जनतेची फसवणुक केली असल्याचे निष्पन्न झाले असुन आरोपींचे बॅक अकाउंटचे स्टेटमेंटवरून अंदाजे १५ ते १६ कोटी रूपयांची उलाढाल असल्याचे दिसुन येत आहे. आरोपीने यांनी सर्व पैसा हवाला यांचे अंगडीया यांचे मार्फतीने महाराष्ट्रातुन, मुंबईत, आणि सहारनपुर असा नेला आहे. आरोपींनी महाराष्ट्रात विविध ठिकाणी आणि इतर राज्यातही अशी बनावट औषधी पुरविल्याचे तपासात निष्पन्न झाले. सदर आरोपीतांनी औषध खरेदी विक्री करण्याकरीता लागणारे फार्मासीटीकल प्रमाणपत्र G.M.C.C. आणि C.O.A यांचे सुध्दा बनावटीकरण करून खोटे प्रमाणपत्र तयार केले. तसेच के पी मेडीकलचे बील सुध्दा खोटे तयार करण्यात आले होते.

मा. श्री. अनिल म्हस्के ( I.P.S.) ASP तथा SDPO सावनेर विभाग यांनी तसेच त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी ज्या ठिकाणी बनावट औषध तयार केली गेली तिथपर्यंत पोहचुन आरोपींच्या मुसक्या आवळल्या व गुन्हा उघडकीस आनला असल्याने ईतरही जिल्हयातील गुन्हे उघडकीस आलेले आहेत. गुन्हयाचा आणखी तपास सुरू असुन गुन्हयातील आरोपींनी बनावट औषधी झारखंड, हरियाणा या राज्यात सुध्दा विक्री केले असल्याची माहीती आहे व पुढील तपासामध्ये आणखी काही धागेदोरे बाहेर येण्याची शक्यता आहे. दिनांक २०.०९.२०२४ सदर गुन्हयामध्ये एकुण ०६ आरोपी नामे– १) हेमंत धोंडीबा मुळे वय ४२ वर्ष रा कव्वा रोड, लातुर २) मिहीर शशिकांत त्रिवेदी वय ३८ वर्ष रा टेमघर भिवंडी ३) विजय शैलेंद्र चौधरी वय ३२ वर्ष रा मीरा रोड ठाणे, ४) रमन विजयकुमार तनेजा वय ३६ वर्ष रा जनता रोड सहारनपुर, ५) रॉबिन उर्फ हीमांशु विजयकुमार तनेजा वय ३६ वर्ष जनता रोड सहारनपुर ६) अमित सुरेचंद्र धिमान वय ३६ वर्ष रा मतलबपुर पोलीस ठाणे गंगनहर, रूडकी जि हरीद्वार उत्तराखंड यांचे विरूध्द दोषारोप मा. न्यायालयात दाखल केले असुन सदर गुन्हयाचा तपास संपलेला नसुन अधिक पुरावे दाखल करण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली श्री अनिल म्हस्के (भापोसे), तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग, पोलीस उपनिरीक्षक श्री कोलते, पोलीस हवालदार सतिश राठोड, पोलीस अंमलदार नितेश पुसाम, मनिष सोनवणे यांनी पार पाडली.






## पोलीस स्टेशन सावनेर कडुन सर्व तिन चाकी व चार चाकी वाहनचालकांना सावधानतेचा इशारा

पोलीस स्टेशन सावनेर तर्फे सर्व तिन चाकी व चार चाकी प्रवासी व मालवाहतुक करणा—या वाहन चालकांना सावध करण्यात येत आहे कि, एक इसम नागपुर शहरातुन ऑटो भाड्याने करून तो त्यांना भाड्याची रक्कम देतो व ऑटो चालकाने प्रवाशाला नियोजीत ठिकाणी पोहचविल्यावर त्या ऑटो चालकास थोडा वेळ थांबण्यास सांगुन तो प्रवाशी एखादा दुकानात जातो व थोड्या वेळाने ऑटो चालकाजवळ येवुन तो एखादा गावाचे नाव सांगुन तिथे आमचा मालाचे पार्सल आलेले असुन तिथे जावुन ते पार्सल आणायचे आहे. असे सांगुन ऑटो चालकासोबत जाण्या येण्याचा किराया ठरवितो व त्या ऑटोने तो संबधीत गावात जातो. ऑटोला त्या गावातील रेल्वे स्टेशनवर घेवुन जावुन प्रवाशी ऑटोचे खाली उतरून रेल्वे स्टेशनचे आत जातो. १० मिनीटाने परत ऑटोजवळ येवुन ऑटो चालकास सांगतो कि, आमचे पार्सल रेल्वे स्टेशनला आलेले आहे. त्या मालाचे पेमेन्ट पार्टीला केल्याशिवाय पार्सल ताब्यात मिळणार नाही. रेल्वे स्टेशनला कॅश पेमेंन्ट घेत नाही. मी तुम्हाला नगदी २०,०००/— रू किंवा अन्य रक्कम देतो. तुम्ही मला तुमच्या जवळील रक्कम ऑनलाईन ट्रान्सफर करा असे म्हणतो. ऑटो चालक त्या प्रवाशाला अडचणीत पाहुन त्याची दया घेवुन ऑटो चालक होकार देतो. प्रवाशी आपल्या मोबाईल मधील स्कॅनर देवुन ऑटो चालकास स्कॅन करण्यास सांगुन ऑनलाईन रक्कम ट्रान्सफर करायला लावतो. व ऑटो चालकाने रक्कम त्याचे बॅंक अकाउंटला ट्रान्सफर केली तसाच तो प्रवाशी तेथुन पळुन जातो. तरी सर्व ऑटो चालक व चार चाकी प्रवाशी व मालवाहु चालकांनी सावध राहावे. व कोणत्याही अनोळखी प्रवाशाने तुम्हाला त्याचे खात्यात ऑनलाईन पैशे टाकण्यास सांगितल्यास पैशे ऑनलाईन ट्रान्सफर करू नये. व होणा—या फसवणुकीपासुन वाचावे. असे आवाहन करण्यात येते.

## जनावरांची अवैध वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

दिनांक २१/०९/२०२४ रोजी पोलीस स्टेशन रामटेक परीसरात पेट्रोलींग करीत असता मुखबीर दवारे माहीती मीळाली की गोवंश जनावरे घेउन जात आहे, अशा माहीतीवरून वाहीटोला येथे रामटेक शहराकडुन पांढरा रंगाचा आयसर दिसुन आला असता, त्याला थांबवुन विचारपुस केले यातील आरोपी नामे— **पो मोहम्मद सादिक सइद वय २४ वर्ष रा भाजीमंडी कामठी जि नागपुर २) क्लिनर नामे— तोहीद अहमद खान वय २२ वर्ष रा भाजीमंडी रा.कामठी जि नागपुर** याचे ताब्यातील अशोक ले लॅन्ड ट्रक क्र एम एच ४० टीसी ०४३४ किंमत २५,००,०००/—रू त्यात पांढरा रंगाच्या १० बैल किंमती १,००,०००/—रू कोशा बिरंगी रंगाचे ०४ बैल किंमत ४०,०००/—रू असा एकुन माल **२६,४०,०००/—रू चा माल** सदर जनावरांची चारा पाण्याची सोय न करता जनावरांना डाल्यामधे कोंबुन वाहतुक करतांना दिसुन आले, घटनास्थळ पंचनामा कारवाही करून जनावरांना चारा पाण्यासाठी व देखभालीसाठी सुकुत गौशाळा पिंपळगाव ता लाखनी जि भंडारा येथे जमा केले असुन सदर नमुद आरोपी यांचेविरूद्ध पोस्टे रामटेक येथे कलम ११(१)(डी) प्राण्याचा छळ अधिनीयम १९६० गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयातील आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोहवा गजानन माहूरे मो न ८७८८३१६१८२ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे रामटेक येथील ठाणेदार प्रशांत काळे यांचे नेतृत्वात त्यांचा स्टाफ यांनी पार पाडली.

## मोटर सायकल चोरी करणारा आरोपी अटकेत

पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत फिर्यादी नामे– सौ सारीका सुरेश पराते रा शिक्षक कॉलनी कळमेश्वर यांनी रिपोर्ट दिला कि, दिनांक ०१/०९/२४ ते २/९/२४ चे ०५.३० वा दरम्यान त्यांचे राहते घरी वार्ड क्र ५ शिक्षक कॉलनी कळमेश्वर येथे त्यांची मोटर सायकल स्प्लेंडर क्रमांक एम एच ४० सीपी २६३६ किंमत ४०,०००/–रू ची घराच्या कंपाउंड मध्ये ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याचे रिपोर्टवरून पो स्टे कळमेश्वर येथे कलम ३०३ (२) भान्यास चा गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयातील तपासात खात्रीशीर माहीतगार इसमाकडुन गुप्त माहीती घेवुन यातील संशईत आरोपी नामे– (१) तेजस अंबर रामावत वय २२ वर्ष रा ब्राम्हणी ता. कळमेश्वर (१)विक्की रामकृष्ण भलावी वय १८ वर्ष रा येरला ता. कळमेश्वर यांना ताब्यात घेवुन गुन्हयासंबधाने सखोल विचारपुस केली असता सदर मोटर सायकल त्यांनी नेल्याचे कबुली दिल्याने नमुद दोन्ही आरोपीस दिनांक २१.०९.२४ रोजी अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे कळमेश्वर येथील ठाणेदार मनोज काळबांडे यांचे नेतृत्वात त्यांचे स्टाफ यांनी पार पाडली.

## अवैध रेतीची वाहतूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

दि. २१/०९/२०२४ रोजी पोस्टे केळवद येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, केळवद हद्दीत मौजा सावळी फाटा येथे अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतूक होत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून मौजा सावळी फाटा येथे नाकाबंदी केली असता **आरोपी नामे–** १) प्रकाश कन्हैया कटोते वय ३२ वर्ष रा वॉर्ड क्र २ बाजार चौक कोराडी २) राजकुमार मनिराम राजपुत वय २४ वर्ष रा बोरुजवाडा वार्ड क्र ३ सावनेर याने त्याचे ताब्यातील १) १० चक्का ट्रक क्र एम एच ४० वाय ९९२७ असे नमुद असलेला किमंती अंदाजे २१,००,०००/– तसेच ज्यामध्ये क्षमतेपेक्षा दोन ब्रास वाळु किं. १२०००/– असलेली असा एकुण २१,१२,०००/– रू. चा माल चा मुद्देमाल अवैध्यरित्या विनापरवाना रेती चोरीचे गौणखनिज वाहतुक करतांना मिळुन आल्याने जप्त करण्यात आला आहे. **आरोपी चालक –** १) प्रकाश कन्हैया कटोते वय ३२ वर्ष रा वॉर्ड क्र २ बाजार चौक कोराडी २) राजकुमार मनिराम राजपुत वय २४ वर्ष रा बोरुजवाडा वार्ड क्र ३ सावनेर यांचेविरूद्ध पोस्टे केळवद येथे कलम ३०३ (२), ४९ भा. न्या. सं सहकलम ४८(८)जमिन महसुल अधिनियम १९६६ सहकलम–३ सार्वजनिक मालमत्ता नुकसान अधिनियम, सहकलम–४/२१ खान खनिज अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी चालक यास अटक केली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे केळवद येथील ठाणेदार सपोनि अनिल राउत यांचे नेतृत्वात त्यांचा स्टाफ यांनी पार पाडली.

## प्राणांतीक अपघात

दिनांक १७.०९.२४ रोजी पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत सावनेर ते चौदामैल हायवे रोड वरोडा येथे यातिल मृतक हा प्लेझर गाडी क्रं एम.एच.३१.इ.एल.३१०७ ने कळमेश्वर वरून राहते घरी सावनेर येत असता वरोडा नदीच्या जवळ समोरून येणारा छोटा हाती अशोक ले लॅड क्रं एम.एच.४९.ए.टी. ३२४८ ने धडक दिल्याने गंभीर जख्मी झाल्याने लोकांनी उपचारा कामी ग्रामीण रूग्णालय कळमेश्वर येथे नेले असता डॉक्टरांनी नागपुर रेफर केल्याने मेयो हॉस्पीटल येथे वैद्यकीय अधिकारी यांनी मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अरविंद तुळशीराम शेलखे वय ३८ वर्ष रा शिक्षक कॉलोनी कळमेश्वर यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम २८१,१२५(ब),१०६ (१) भा.न्या.सं. सहकलम १८४ मोटर वाहन कायदा अन्वयें सदर गुन्हा दाखल असुन तपासात आहे. आरोपीचा शोध सुरू आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**